**Mumbai, 12 April, 2023:**

MMRDA is executing mega projects in Mumbai & MMR which is a complex & at times gargantuan task due to narrow roads, traffic congestion, utilities, slums, encroachments , night time working etc in the Maximum City. In addition , MMRDA faces huge legal issues while executing mega projects, leading to cost & time over runs. Public also gets inconvenienced in the process. But MMRDA administration is dealing with these complexities on a regular basis.

**Metro line 4 achieves 49% Physical Work Completion**

**Project delayed due to litigation will now be expedited**

MMRDA's metro line 4 from Wadala to Kasarvadavli has achieved 49% physical work completion. Team MMRDA recently erected 156 platform pier caps across 13 metro stations in metro line 4. Majority of 84 PPCs were erected between Mulund fire station to Majiwada & the remaining 72 PPCs were erected between Garodia Nagar & Surya Nagar in Ghatkopar area. Erection of these PPCs will facilitate erection of other station elements like T,L & U girders, platform slab, staircase upto platform level etc. The construction of metro line 4 was began in the year 2018, although the pace slowed down due COVID pandemic and pending litigations pertaining to land acquisitions. However now Hon'ble Bombay high court has come to MMRDA's rescue which will go a long way in expediting the project.

**Indo Nippon Case verdict #Metro Line4**

**Indo Nippon Chemical Co. Ltd. in 2018 & Shree Yashwant Co-operative Housing Society Ltd. in 2019**

filed a WRIT Petition with Hon'ble Bombay High Court stating that they were aggrieved by alignment of Metro Line 4 & they further said that the alignment not only is affecting their respective properties but they also alleged that the entire execution and implementation of Metro is in violation of the Statutory provisions including the Land Acquisition done under MRTP Act, 1966. Adding further, the petitioner also demanded a compensation of sum of about Rs.301 Cr/- on the basis of private valuation report. This litigation resulted in break of continuity. In Yashwant society case project delayed by the period of 46 months & cost is escalation hites amounting Rs.1.2 Cr. approx, as well as in Nippon case project cost in escalated Rs. 80 Lac in 29 months.

MMRDA & the State Government provided the Hon'ble court with all the details regarding the due procedures followed during the land acquisition. Taking all the facts into consideration Hon'ble High Court ruled in favour of MMRDA & State Government as it did not find any error in action of finalizing the alignment of Metro Line 4, land acquisition proceedings and implementation of Metro Project. Hon'ble high court while passing the judgement mentioned that the petitioners unnecessarily raised larger issues questioning authority of MMRDA in implementing ML-4. The petitioners under the garb of protecting and enforcing private rights of their properties have made attempts to stall and delay public project of immense importance & this deserves imposition of cost.

**PIL against NOC for #Metro Line 2B dismissed**

MMRDA also received a green signal in a PIL pertaining to Metro line 2B. In a petition challenging the No objection issued to MMRDA for construction of the of the metro rail Line 2B near Juhu Airport. Their main contention was that the NOC was issued contrary to the height restrictions given by the Ministry of Civil Aviation. In reply to this MMRDA coordinated with the Airports authority and DGCA and accordingly affidavit was tendered in the Court mentioning the details of the safety measures ensured for the safety of the flyers and the airport. MMRDA contended that the NOC is been rightly issued and is legally valid and is in accordance to the Ministry of Civil Aviation ( Height Restrictions for the Safeguarding of Airport Operation) Rules,2015 and explained to the importance of the project. Taking into consideration the above submissions the Hon'ble High court disposed off the PIL.

Speaking about these recent developments Shri S.V.R. Srinivas, IAS, Metropolitan Commissioner, MMRDA said **"Infrastructure project like metro lines that MMRDA undertakes are for greater public benefits and they shouldn't be embroiled in such legal battles which lead to delay in project delivery and cost to exchequer. We are thankful that Hon. High Court has ruled the case in our favour & quashed the PIL on merit. MMRDA's legal team is well equipped in handling such cases and with the results finally coming in our favour we can now accelerate the work."**

मुंबई, १२ एप्रिल, २०२३:

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत मुंबई महानगर प्रदेशातील मेट्रो रेल, उड्डाणपूल, रस्ते सागरी सेतू, मोनोरेल यांसारखे महत्वकांक्षी आणि लोकाभिमुख प्रकल्प राबविले जात आहेत. मुंबई सारख्या कमी क्षेत्रफळात दाट लोकवस्ती असलेल्या शहरात असे मोठे प्रकल्प राबविताना शहरातील अरुंद रस्ते, वाहतूक कोंडी, अनियमित बांधकामे, अतिक्रमणे यांसारख्या बाबींचा सामना करावा लागतो. याशिवाय बऱ्याचवेळा कायदेशीर समस्यांचा सामना करावा लागतो, ज्यामुळे प्रकल्पपूर्ततेस बऱ्याचदा विलंब आणि प्रकल्पाच्या किमतीत वाढ होते. या सर्व बाबींमुळे सामान्य नागरिकांचीही गैरसोय देखील होते. परंतु प्राधिकरणाचे प्रशासन नियमितपणे या गुंतागुंतींचा सामना करण्यासाठी सक्षम आहे.

**मुंबई मेट्रो मार्ग ४ चे ४९% भौतिक प्रगती पूर्ण**

**न्यायालयीन खटल्यांमुळे विलंब झालेल्या प्रकल्पाला मिळणार गती**

प्राधिकरणाने वडाळा ते कासारवडवली दरम्यान प्रगतीपथावर असलेल्या मेट्रो मार्ग ४ च्या संतेखणातील१३ मेट्रो स्थनाकांसाठी १५६ प्लॅटफॉर्म पिअर कॅप्स (PPC's) उभारले आहेत. मुलुंड फायर स्टेशन ते माजिवडा दरम्यान ८४ PPC आणि ७२ PPC घाटकोपर परिसरातील गारोडिया नगर आणि सूर्या नगर दरम्यान उभारण्यात आले आहेत. या PPCs च्या उभारणीमुळे इतर स्टेशन घटक जसे की T, L आणि U गर्डर्स, प्लॅटफॉर्म स्लॅब, प्लॅटफॉर्म स्तरापर्यंत जिना इत्यादी उभारणे सुलभ होईल.

सन २०१८ मध्ये स्थापत्य कामांना सुरू झालेल्या मुंबई मेट्रो मार्ग ४ च्या प्रगतीवर कोविड महामारी तसेच जमीन अधिग्रहणासंबंधित न्यायालयीन खटल्यांमुळे बराच परिणाम झाला असून प्रकल्पाची प्रगती मंदावली. आता माननीय मुंबई उच्च न्यायालयाच्या निकालामुळे या प्रकल्पाला गती देण्यास फायदेशीर ठरेल.

**२०१८ इंडो निप्पॉन केलिकल कं. मर्या. खटला आणि २०१९ यशवंत को.हा. सो.ली. खटल्याचा निकाल #Metro Line4**

२०१८ मध्ये इंडो निप्पॉन केलिकल कं. मर्या. आणि २०१९ मध्ये यशवंत को.हा. सो.ली. या दोन्ही फिर्यादिंनी मा. मुंबई उच्च न्यायालयात रिट याचिका दाखल केली. त्यांच्या म्हणण्यानुसार ते संरेखन केवळ त्यांच्या संबंधित मालमत्तेवर परिणाम करत नाही तर त्यांनी संपूर्ण मेट्रो मार्ग ४ ची अंमलबजावणी महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन आणि नगर रचना अधिनियम, १९६६ नुसार केलेल्या भूसंपादनासह वैधानिक तरतुदींचे उल्लंघन करते. तसेच याचिकाकर्त्याने खाजगी मूल्यांकन अहवालाच्या आधारे सुमारे रु. ३०१ कोटी इतकी भरपाई देण्याची मागणी केली होती. ज्याच्या परिणाम प्रकल्पाच्या प्रगतीत खंड पडून, यशवंत सोसायटी प्रकरणामध्ये प्रकल्पाला ४६ महिन्यांच्या कालावधीने विलंब झाला असून खर्च सुमारे रु.१.२ कोटी इतका वाढला. तसेच निप्पॉन प्रकरणामध्ये प्रकल्पाचा २९ महिन्याचा कालावधी वया गेला असून रू. ८० लाख इतका खर्च वाढला.

मुंबई महानगर विकास प्राधिकरण आणि राज्य सरकारने माननीय उच्च न्यायालयास भूसंपादनादरम्यान अवलंबलेल्या योग्य प्रक्रियेसंबंधी सर्व तपशील सदर केले. सादर केलेले सर्व तथ्ये विचारात घेऊन माननीय उच्च न्यायालयाने प्राधिकरण आणि राज्य सरकारच्या बाजूने निर्णय दिला, तसेच त्यांना मेट्रो मार्ग ४ चे संरेखन, भूसंपादन कार्यवाही आणि मेट्रो प्रकल्पाच्या अंमलबजावणीमध्ये कोणतीही त्रुटी आढळली नसल्याचे नमूद केले. माननीय उच्च न्यायालयाने निकाल देताना असेही नमूद केले की मेट्रो मार्ग ४ ची अंमलबजावणी याचिकाकर्त्यांनी त्यांच्या मालमत्तेच्या खाजगी

अधिकारांचे संरक्षण आणि अंमलबजावणी करण्याच्या नावाखाली अत्यंत महत्त्वाचा सार्वजनिक प्रकल्प रखडवण्याचा प्रयत्न करत एमएमआरडीएच्या अधिकारावर प्रश्नचिन्ह उपस्थित करणारे अनावश्यक असे मोठे मुद्दे उपस्थित केल्याने याचिकाकर्ते हे दंडास पात्र असल्याचे अधोरेखीत केले.

**मेट्रो मार्ग २ब साठीची नाहरकत (NOC) विरुद्ध जनहित याचिका मा. उच्च न्यायालयाने फेटाळली**

जुहू विमानतळाजवळील मेट्रो मार्ग २ब च्या बांधकामासाठी एमएमआरडीएला देण्यात आलेल्या ना-हरकतीला आव्हान देणारी याचिका मा. उच्च न्यायालयाने फेटाळली आहे. याचिकाकर्त्यांच्या म्हणण्यानुसार नागरी विमान वाहतूक मंत्रालयाने मंजुरी दिलेल्या उंचीच्या निर्बंधांच्या विरोधात एमएमआरडीएला एनओसी जारी करण्यात आली आहे असा त्यांचा मुख्य तर्क होता. या याचिकेस उत्तर देताना एमएमआरडीएने विमानतळ प्राधिकरण आणि डीजीसीए यांच्याशी समन्वय साधून न्यायालयात प्रतिज्ञापत्र सादर केले. ज्यात उड्डाण करणाऱ्या विमानांच्या तसेच विमानतळाच्या सुरक्षेसाठी सुनिश्चित केलेल्या सुरक्षा उपायांचा तपशील नमूद केला आहे. एनओसी योग्यरित्या जारी केली गेली आहे आणि कायदेशीररित्या वैध असून नागरी विमान वाहतूक मंत्रालय (विमानतळ ऑपरेशनच्या सुरक्षिततेसाठी उंची प्रतिबंध) नियम, 2015 नुसार असल्याचा दावा एमएमआरडीएने केला, त्यासोबत सदर प्रकल्पाचे महत्त्व देखील स्पष्ट केले. सादर करण्यात आलेल्या वरील सर्व बाबी विचारात घेऊन माननीय उच्च न्यायालयाने जनहित याचिका फेटाळली.

वरील घडामोडींवर भाष्य करताना मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे महानगर आयुक्त श्री एस. व्ही.आर. श्रीनिवास, भा. प्र.से., म्हणाले **"एमएमआरडीएने हाती घेतलेल्या मेट्रो मार्गिकांसारखे महत्त्वाकांक्षी पायाभूत सुविधा प्रकल्प हे लोकहितासाठी असल्याने ते अशा कायदेशीर लढाईत अडकता कामा नये ज्यामुळे प्रकल्पाच्या पूर्णत्वास विलंब होऊन खर्चात वाढ होते. आम्ही आभारी आहोत की मा. उच्च न्यायालयाने आमच्या बाजूने निकाल दिला आणि गुणवत्तेवर जनहित याचिका रद्द केली. एमएमआरडीए चे कायदेतज्ञ अशी प्रकरणे हाताळण्यासाठी सुसज्ज असून हे प्रकरण निकाली लागल्यामुळे आता प्रकल्पाला गती देऊ शकतो."**